महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीसाठी विशेष फिडर सेवा

## महा मेट्रो आणि एनएमसी संयुक्त उपक्रमाने विद्यार्थ्यांचा प्रवास होणार सुकर



नागपूर: शहरापासून थोडं दूर, एका टोकावर असणाऱ्या वाठोडा परिसरातील सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजिच्या विद्यार्थ्यांना प्रवासाचे सोपे आणि स्वस्त साधन उपलब्ध करून देण्याकरता नागपूर मेट्रो आणि नागपूर महानगर पालिके तर्फे संयुक्त उपक्रम राबवला जाणार आहे. येत्या काही दिवसात विद्यार्थ्यांकरिता आपली बस सेवा सुरु होणार असून यामुळे या शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात प्रवास करण्यात लाभ होणार आहे.

नागपूर मेट्रोच्या मल्टी मॉडेल इंटिग्रेशन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या फस्ट टू लास्ट माईल कनेक्टिविटी या कार्याशी संबंधित प्रवाश्यांना त्यांच्या गंतव्याच्या जागेपासून मेट्रोपर्यंत जोडण्यासाठी मेट्रो कार्यालय वेळोवेळी अनेक उपक्रम राबवत असतात. घर ते मेट्रो आणि मेट्रो ते घर या दरम्यान लागणाऱ्या वाहतुकीच्या सोयीसाठी महानगर पालिका यांच्याशी संगनमत करून आपली सेवा किंवा शेअर ऑटो सारख्या अनेक सोयी सुविधा आजवर मेट्रोने उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याच अनुषंगाने नागपूर शहरात पुणे येथील मुख्यालय असलेल्या सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीची शाखा पूर्व नागपूरातील वाठोडा भागात ५ वर्षांपूर्वी सुरु झाली व तेथे सिम्बॉयसिस इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि ही अभियांत्रिकी संस्था, विधी विभाग व प्रबंधन विभाग सुरु आहेत. ही युनिव्हर्सिटी महा मेट्रोच्या एक्वा मार्गिकेवरील प्रजापती नगर स्टेशनपासून ४ किमी अंतरावर असून तेथे शिकणारे शहरात विविध परिसरात राहणारे बहुतांश विद्यार्थी विद्यापीठात येण्याकरता मोठ्या प्रमाणात स्वतःच्या वाहनांचा वापर करतात. या विद्यर्थ्यांचा वेळ, ऊर्जा आणि पैसे वाचावे तसेच त्यांनी सुरक्षित आणि आरामदायक वातावरणात प्रवास करावा या हेतूने त्यांच्यासाठी या सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महामेट्रोचे मल्टी-मोडल इंटिग्रेशन (MMI) आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन विभागातर्फे सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि येथे मेट्रो संवाद उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ नितीन राकेश व विद्यार्थी विषयक घडामोडींवर लक्ष ठेवणारे डॉ रामदास खोमणे यांच्या सहकार्याने हा चर्चात्मक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. या दरम्यान झालेल्या चर्चेदरम्यान संचालक श्री नितीन राकेश यांनी मेट्रोचे प्रजापती नगर स्टेशन येथून संस्थेसाठी बससेवा सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला.

त्यानंतर महामेट्रो, मनपाचे ट्रान्सपोर्ट विभाग व महाविद्यालय यांची संयुक्त बैठक झाली व त्यात संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी प्रजापती नगर मेट्रो स्टेशन पासून विद्यार्थ्यांच्या सोयीकरता आणि त्यांच्या वेळेनुसार सकाळी आणि संख्याकाळी फिडर सेवा सुरु कारण्यासासंबंधीचा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या  कॅम्पसपासुन तर प्रजापतीला मेट्रो स्टेशनपर्यंत फीडर बस सेवा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याची सुरुवात म्हणून  सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि येथे मेट्रो आणि महानगर पालिके तर्फे या संपूर्ण उपक्रमाची माहिती देण्याकरता शिबीरचे आयोजन देखील करण्यात आले. या संबंधी आता बाबी ठरल्या असून त्या प्रमाणे दिनांक १८ सप्टेंबर रोजी या फीडरसेवेची शुभांरंभ महामेट्रो, मनपा व संस्थेच्या  मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

महामेट्रो संस्थेत मेट्रो संवाद कार्यक्रम घेण्यात आला व त्यात सद्याच्या वातावरणात बदल ग्लोबल वॉर्मिंग, हवेचे प्रदूषणात' fossil fuel based vehicles' चा प्रचंड वाटा तसेच महामेट्रोतर्फे व मनपातर्फे विद्यार्थ्यांना देण्यात येणारे सुट, महामेट्रोतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधा सवलती याबाबत माहिती देण्यात आली. व विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. सुरवातीला एक बस सेवा सुरु करण्यात येणार असुन विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीनुसार फीडरबसची संख्या वाढविण्यात येईल.